उपशिक्षणाधिकारी व तत्सम, गट-ब संवर्गातील उमेदवारांच्या एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण (सीपीटीपी-४) करिता निर्माण करण्यात आलेली अधिसंख्य पदे पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : बिंदूना-३०१६/प्र.क्र.२००/प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १९ सप्टेंबर, २०१९

संदर्भ :-

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : टिआरएन-२०१३/प्र.क्र.८४/१३/१२-अ, दिनांक २० जानेवारी, २०१४

२. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : पदनि-२०१६/प्र.क्र..७/१६/वित्तीय सुधारणा-१,

दिनांक २० फेब्रुवारी, २०१६

३. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक : बिंदूना-३०१६/प्र.क्र.२००/प्रशा-२, दिनांक १ ऑगस्ट, २०१७

शासन निर्णय -

उपशिक्षणाधिकारी व तत्सम, गट-ब संवर्गामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राज्यसेवा (मुख्य) परीक्षा-२०१६ च्या अंतिम निकालाच्या आधारे निवड झालेल्या व एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-४ मध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या ६ उमेदवारांसाठी दिनांक १ ऑगस्ट, २०१७ च्या शासन निर्णयाद्वारे ६ अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आली आहेत. तथापि, एका उमेदवाराचे आकस्मिक निधन झाल्याने, ५ उमेदवारांचे प्रशिक्षण सुरू आहे.

२. परिविक्षाधीन अधिकाऱ्यांची सेवाज्येष्ठता तयार करण्याबाबतची कार्यवाही चालू असून, तात्पुरती सेवाज्येष्ठता तयार होण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने, सदर अधिकारी सद्यस्थितीत ज्या ठिकाणी जिल्हा संलग्नेतचे प्रशिक्षण घेत आहेत त्या ठिकाणी त्यांना दिनांक ३०.०९.२०१९ अखेरपर्यंत अथवा विभागीय संवर्ग वाटप होईपर्यंत जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत पुढे चालू ठेवण्यास मुदतवाढ देण्याबाबत शासन मंजूरी देण्यात येत आहे.

३. उपशिक्षणाधिकारी व तत्सम, गट-ब संवर्गातील सदर ५ अधिसंख्य पदांच्या वेतनावर येणारा खर्च या विभागाच्या "मागणी क्र.ई-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण-०१-प्राथमिक शिक्षण, १०४ निरिक्षण (००)(०१) प्राथमिक शाळांची तपासणी, २२०१००२१" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा आणि सन २०१९-२० या वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दिनांक २० फेब्रुवारी, २०१६ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१९०९१९२०४१३०३८२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh
Basaveshwar
Mamadapure

Digitally signed by Santosh Basaveshwar Mamadapure
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3bfe111652996d95372924b1d22cdf88b33dfa2a3de3d8ea011b7d83adc40cb6, serialNumber=557abe7a7194ec5ddc74df537d7d57a9dbda20b1937a2e41983c35f6a38b6ad8, cn=Santosh Basaveshwar Mamadapure
Date: 2019.09.21 10:29:03 +05'30'

(संतोष ममदापुरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल १/ २ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर.
२. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
३. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे,
४. महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे
५. महासंचालक, वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, वनामती, बोले पेट्रोल पंप जवळ, अमरावती रोड, धरमपेठ, नागपुर- ४४२ ४१०
६. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
७. शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
९. जिल्हा कोषागार कार्यालय, पुणे/नागपूर
१०. वित्त विभाग (वित्तीय सुधारणा-१), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
११. अवर सचिव (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. अवर सचिव (प्रशा-५), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. निवडनस्ती.